म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. ७५१८

# गंधमोहिनी

REFBK-0013495
REFBK-0013495

श्रीकृष्ण पोंक्षे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३४८२१ वि: कादंबरी
क्रमांक ... नों: दि: २१/१२/८३
१७१९

# गंधमोहिनी

कविता-संग्रह

REFBK-0013495

REFBK-0013495

93०९५

श्रीकृष्ण पोंक्षे

सरस्वती प्रकाशन, पुणें

एकमेव विक्रेते : बॉम्बे बुक डेपो, २१७ चर्नी रोड, मुंबई ४

प्रथमावृत्ति :
गणेशचतुर्थी
२३ ऑगस्ट १९६३

© श्रीकृष्ण पोंक्षे

प्रकाशक :
सौ. सिंधु वझे
सरस्वती प्रकाशन
४१४ सदाशिव पेठ, पुणें

मुद्रक :
य. गो. जोशी,
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव पेठ, पुणें

वेष्टण :
पद्माकर पोंक्षे
अजंठा ॲडव्हर्टायझर्स, मुंबई

**मूल्य तीन रुपये**

**सरस्वती**
: ७ :

प्रिय नंदा
आणि
ताईस

९३८९५
(स्थळ प्रत)
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५८७१ वि:
क्रमांक नों दि:
९०९८

## पुरस्कार

श्रीकृष्ण पोंक्षे हे साने गुरुजींच्या धडपडणाऱ्या मुलांपैकीं आहेत. प्रतिकूल परिस्थितीमुळें शिक्षणाकडे पाठ करून पोरवयांतच त्यांना उपार्जनाची खडतर वाट धरावी लागली. दारिद्र्याचीं त्रिविध दुःखें पहावीं सहावीं लागलीं. पण ते आपल्या श्रद्धेपासून चळले नाहींत. उलट आलेल्या अनुभवांमुळें त्यांची श्रद्धा अधिकच बळकट झाली आणि त्यांची जन्मसिद्ध सहृदयता अधिकच सघन झाली. तिनेंच त्यांचा जीवनानंद टिकवून धरला होता आणि तीच त्यांच्या कल्पनाचक्षूंसमोर स्वप्नांचे ताटवे फुलवीत होती. एक दिवस चमत्कार झाला आणि हा काव्यलुब्ध जीव छापखान्यांतील अक्षरें जुळवतां जुळवतांच कवितेच्या छंदोबद्ध ओळी जुळवूं लागला. निर्मितीच्या या अभिनव आनंदांत त्याच्या कांट्यांचीं फुलें झालीं. आणि जखमांना भूषणांची कळा प्राप्त झाली. आपला बुजरेपणा सांवरीत एक दिवस ते मला भेटायला आले. त्यांनीं आपल्या कविता मला वाचून दाखविल्या. पूर्वसूरींचे सूर त्यांतून स्पष्ट जाणवत होते आणि तरीहि त्यांचें स्वतःचें असें कांहींतरी, पुसटपणें कां होईना, त्यांतून डोकावत होतें. त्यांतून व्यक्त झालेली त्यांची काव्यशक्ति जरी अंगुष्ठमात्र होती; तरी ती

खरीखुरी होती. इंधन चार ठिकाणांहून गोळा केलेलें होतें; पण तें पेटवणारी आग त्यांची स्वतःची होती. अशी आग पूर्वपुण्याईनें अनेकांना लाभते पण तिचें अग्निहोत्र बनविण्याची निष्ठा फारच थोडयांत असते. आजकाल दुर्मिळ झालेली ही निष्ठा मला पोंक्ष्यांत दिसली आणि दिवसेंदिवस ती अधिकाधिक पुष्ट होत चालल्याचें मी पहात आहें. म्हणूनच ‘ माझ्या या पहिल्या कविता-संग्रहाला तुम्ही प्रस्तावना लिहावी ’ अशी जेव्हां त्यांनीं मला विनंती केली, तेव्हां मीं ती चटकन मान्य केली. वस्तुतः कविता घुमावी अन् लिहावी आणि संधि मिळेल तेव्हां अन्य कवीची कविता वाचावी किंवा त्याच्या तोंडून ऐकावी, हा माझा शिरस्ता. त्यापलिकडे मी सहसा जात नाहीं. पण पोंक्ष्यांच्या कवितेवरील निष्ठेनें तो मला मोडायला लावला. पण मला त्याबद्दल खंत नाहीं.

पोंक्ष्यांना कविता ही आपली जीवनसाधना वाटते. परमात्म्याशीं आपलें चिरंतन नातें जोडणारी आणि त्या अमृतबंधाचें पोषण करणारी कल्पवल्ली वाटते.

अपार्थिवाच्या तूं मुरलींतिल
दिव्यस्वरांची मोहनवेल

अशा शब्दांनीं ते तिला आवाहन करतात.

ही कविता भावकथा
मृदु मधुता स्वप्नींची
चांदण्यांत न्हात गात
पडछाया भक्तीची

अशी तिच्याविषयीं त्यांची धारणा आहे. त्यामुळें तिच्यावर त्यांचा इतका

जीव आहे कीं, त्यांच्यापासून ती क्षणकाल जरी दूर झाली, तरी ते कासावीस होतात आणि म्हणतात :

अशी कशी अशी कशी
तुझ्या ओढीची ही व्यथा
जिथें नाहींस तूं तेथें
पेटे नित्य माझी चिता
चिता पेटलेली जरी
जाउं कशी सांग सती
तुझी नाहीं ज्यांत ज्योत
त्यांत नसे मला गती

खेळांत रमण्याचें वय आलें नाहीं तोंपर्यंत मूल जसें वारंवार आईच्या स्पर्शासाठीं आसुसलेलें असतें, तसाच पहिल्या अवस्थेंत कवि फिरफिरून कवितेला साद घालीत असतो. त्याचेंच प्रत्यंतर पोंक्ष्यांच्या कवितेविषयींच्या कवितावैपुल्यांत आढळून येतें. तिच्या सतत चाललेल्या लपंडावामुळें ते वारंवार कष्टी होतात. पण एखाद्या क्षणीं अंतर्मुख होऊन ते म्हणतात—

या वेडानें सर्व भोगिलें विसरून गेलों काय कुठें
मी माझ्यांतच रतलों जेव्हां दिसलिस तूं लपलीस कुठें

या अंतर्मुखतेनेंच त्यांना ईश्वरसन्मुख केलें आहे :

शिंपूनिया रक्त फुलविली बाग
झालीस महाग
तूंच परी

किंवा—

गुंफिल्या माळांचा करूनिया फांस
लाविन गळ्यास
तुझ्या नामें

अशा ओळींतून जेव्हां त्यांची आर्तता प्रगट होते, तेव्हां ती तकलुपी नाहीं याची खात्री पटल्याशिवाय रहात नाहीं.

कवितेइतकाच त्यांना त्या परमचंद्राचा ध्यास आहे. तो चंद्र दिसला नाहीं तरी त्यांच्या हृदयांत चांदरात फुलते. त्यांच्या मनाचा मोर पिसारा फुलवून नाचूं लागतो. त्याला पाहिल्याचा भास होऊन ओठांवर फुलोरा फुलतो. पण तोंच त्यांना आपली मर्यादा जाणवते आणि लाजेनें चूर होऊन ते म्हणतात :

परि लाज लोटते तें हितगूज आंत आंत
परधार्जिणाच माझा रे शब्दपारिजात

कधीं ते अशा प्रकारें आत्मताडण करतात, तर कधीं—

माझ्याच अश्रूंनीं भिजवून ओठ
आळवितो गीत
मौनांतून
अळणी आयुष्या तेवढीच चव
उरे देवघेव
बाकी व्यर्थ

असे उद्गार काढतात आणि हताश होण्याची वेळ आली कीं, स्वतःलाच धीर देऊन म्हणतात :

... नऊ ...

नको सोडूं धीर सोशी थोडया कळा
हांकेवर एका आली पाणकळा

आर्त साधकाचीं अशीं अनेक लक्षणें पोंक्ष्यांच्या ठिकाणीं असल्याचें त्यांच्या कवितांतून दिसतें आणि त्याचमुळें त्यांच्या कवितेला अधून मधून विळखा घालणारा परधार्जिणेपणा एक दिवस अचानक गळून पडेल, असा मला विश्वास वाटतो.

सुख असो, दुःख असो, प्रीति असो कीं नियती असो, सगळ्यांकडे याच साधकाच्या वृत्तीनें ते पहातात. 'नोकरी,' 'कोडें,' 'नवीवाट,' 'त्या तिथें अवेळीं,' 'जा पुढती,' 'स्फूर्ति,' 'कुजबुज,' 'आधार,' वगैरे त्यांच्या कवितांतून त्यांचें विलोभनीय व्यक्तित्व या दृष्टीनें चांगलेंच जाणवतें. संतकवितेवर पोसलेल्या ह्या तरुण कवीची वाणी सोपी, सरळ, छंदवेडी आणि आत्मवेधी आहे. प्रयोगशील नवकवितेचा एखाददुसरा कित्ता त्यांनीं गिरविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. पण त्यांच्या पिंडाला तो मानवत असल्याचें दिसत नाहीं. पोंक्षे आपल्या पिंडाला आणि अनुभूतीला प्रामाणिक राहून आजच्या निष्ठेनें अशीच वाटचाल करीत राहिले, तर मराठी कवितेच्या क्षेत्रांत स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण जागा ते निश्चित निर्माण करतील, एवढा विश्वास बाळगायला मला वाटतें हा संग्रह पुरेसा आहे.

प्रेदियु रिबेलो
पणजी गोवा

बा. भ. बोरकर
१५ ऑगस्ट १९६३

# मी.... !

सप्रेम नमस्कार वि.

' गंधमोहिनी ' हा माझा पहिला कवितासंग्रह. मीं लिहिलेल्या पहिल्या काव्यपंक्तीपासून तों संग्रहाच्या प्रकाशित अवस्थेपर्यंतची सारी वाट आज परत उजळत आहे.

माझ्या काव्यशक्तीला आव्हान एका रेडिओवरील संगीतिकेनें दिलें आणि मी काव्यनिर्मिती करूं लागलों; खुशीनें, सक्तीनें माझीं कवनें आप्त-मित्रांना ऐकवूं लागलों; प्रथितयशांचीं काव्यें वाचूं लागलों आणि या अथांग सागराच्या मर्यादा कवेंत घेण्याचा प्रयत्न करूं लागलों. निर्मितीच्या या पहिल्या उद्रेकांत मी इतका धुंद होतों कीं, जो भेटेल त्याला ऐकव कविता, असा परिपाठ कांहीं काळ पडून गेला. माझीं हीं गाणीं कुणी प्रीतीनें, कुणी भिडेमुळें, कुणी रसिकतेनें, तर कुणी चिकित्सक दृष्टीनें ऐकत आणि मला प्रोत्साहन देत. अशा अनेकांच्या स्नेहानें माझ्या कवितेला आजचें हें स्वरूप प्राप्त झालें आहे.

माझ्या या उफाळून येणाऱ्या जीवनधारांना योग्य मार्गी लावण्याचें बिकट

काम आजचे मराठींतील तरुण संशोधक आणि माझे परमस्नेही श्री. रा. चिं. ढेरे ( संपादक : इंद्रायणी ) यांनीं करून मला कायमची जवळीक दिली. निर्मितीच्या प्रथमावस्थेंत याचप्रमाणें मला दुसऱ्या एका ज्या थोर व्यक्तीचें मार्गदर्शन लाभलें, ती म्हणजे कविवर्य बा. भ. बोरकर. त्यांचा जो कांहीं काळ मला सहवास लाभला, त्यांतून जीवनविषयक कितीतरी मौलिक विचार मला ऐकतां आले. त्यांच्या रचना त्यांच्या तोंडून ऐकतांना माझ्या मनावर शब्दब्रह्माच्या आणि नादब्रह्माच्या अनेक गती कोरल्या गेल्या. ह्या उभयतांचा हात धरून चालतां चालतांच व्यवसायपरत्वें हे दोघेहि माझ्यापासून दूर गेले आणि आपलें कांहींतरी हरवल्याची हुरहुर माझ्या मनांत राहून गेली. याच आत्मिक प्रीतीच्या पुण्याईनें माझ्या या संग्रहाला कविवर्य बोरकरांच्या प्रस्तावनेचा अलंकार चढला, त्याबद्दल औपचारिकतेचा निर्देश मी करणार नाहीं. त्यांच्या माझ्यावरील प्रीतीला हा बाह्य उपाधींचा आश्रय रुचणार नाहीं.

या संग्रहांतील बऱ्याच कविता ‘ साधना ’, माणूस ’, ‘ मनोहर ’ आदि नियतकालिकांच्या नेहमींच्या व विशेष अंकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यांतल्या त्यांत ‘ माणूस ’ या मासिकानें माझ्या बऱ्याच कवितांना आपल्या अंकांत आत्मियतेनें अग्रस्थान दिलें. ‘ माणूस ’ चे संपादक श्री. श्री. ग. माजगांवकर आणि प्रसिद्धीसाठीं ‘ माणूस ’ मासिकाचें दार मला उघडून देणारे श्री. वि. ग. कानिटकर यांचा मी ऋणी आहें.

कवितेचें प्रकाशन ही प्रकाशकाच्या दृष्टीनें कांहीं विशेष फायद्याची गोष्ट नाहीं; तरीहि माझे ज्येष्ठ मित्र श्री. चिं. ग. वझे यांनीं ती जबाबदारी उचलली; त्याबद्दल मी त्यांचा कायमचा ऋणी झालों आहें. पुस्तकाचें वेष्टणचित्र ‘ अजंठा ॲडव्हर्टायझर्स मुंबई ’ चे कलाविभागप्रमुख श्री. पद्माकर पोंक्षे यांनीं तयार करून देऊन माझ्यावरील आपला स्नेह व्यक्त केला आहे. पुस्तकाची छपाई आकर्षक स्वरूपांत

सादर करण्याची निष्ठा ज्या कांहीं मोजक्या मुद्रकांच्या ठिकाणीं आहे अशा मुद्रकांपैकींच श्री. दादा जोशी यांनीं या संग्रहाला सुबक मुद्रणाचें लेणें चढवलें आहे.

अशा अनेक ज्ञात आणि अज्ञात सुहृदांच्या व हितचिंतकांच्या शक्तींचा स्पर्श माझ्या या संग्रहाला झालेला आहे. यापरता मी व माझें जग म्हणजे माझी कविता. जास्त काय लिहूं ?

लोभ वाढवावा ही विनंती.

किर्लोस्कर प्रेस :<br>
स्वारगेट, पुणें<br>
२३ ऑगस्ट १९६३.

तुमचा<br>
**श्रीकृष्ण पोंक्षे**

# अं त रं ग


गंधमोहिनी १
ही कविता ३
मोहनवेल ५
वेड ६
वेळ ७
आस ८
ऐनवेळीं १०
अमृतस्पर्श १२
अमर आज मी झालों १३
बंगला १४
गाईन प्रीत तूझी १६
याचना १७
दुःख असें दे १८
नवीन २०
नोकरी २१
शोध २२
अपराजिता २३
कोडें २४
तुझ्यासाठिं साहीन २५
माझें शापित जीवन २६
आणि तुझ्या प्रकाशांत २७
नवी वाट २८
माझ्या कोकणभूमींत २९
त्या तिथें अवेळीं ३०
प्रीत ३२
चव ३३
जा पुढती ३४
मागणें ३५
स्फूर्ति ३६
विश्व इष्कीं रंगलें ३७
स्मारक ३८
उद्धार ३९

| | | | |
|---|---|---|---|
| कुजबुज | ४० | गाझी | ६२ |
| मी तृणांकुराचें पातें | ४१ | छेड एकदां तार | ६३ |
| या तहान शमवा | ४२ | ती मी तर काळी रात्र | ६४ |
| तूंच तूंच माझ्या | ४३ | वारी | ६५ |
| आधार | ४४ | सुख माझें पुढें गेल्यावर | ६६ |
| अव्यक्त | ४५ | भीत होतों ज्याला | ६७ |
| माझें गाणें | ४६ | नाटकाच्या रंगीं | ६८ |
| शासन | ४८ | चुकलेल्या मार्गावर | ६९ |
| माप | ५१ | रक्ताळली वीणा | ७० |
| अम्ही कलंदर | ५४ | कहाणी | ७२ |
| तुझ्याविण पण | ५५ | सोनेरी गाणें | ७३ |
| जर | ५६ | पहिला कवि | ७४ |
| मी पणती | ५७ | कोरिव लेणीं | ७५ |
| असें कांहींसें घडावें | ५८ | नव्या युगीं | ७६ |
| मधुघट न रिता | ५९ | धन | ७८ |
| रहस्य फुटलें | ६० | मिठींत घेई क्षण येता | ८० |


* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# गंधमोहिनी

एक कमळ हें फुलतें आहे ...
गंधमोहिनी
हले जागती निमिष पापणी
... इतक्यामधुनी
क्षितिजावर रेंगाळत आहे
हळवें कांहीं
रंग ? ...
छे नव्हे !
ही तर आहे गंधमोहिनी !
रेखित आहे चित्र कुणाचें ...
मोरपिसाचा करुन कुंचला ...
निजलेल्या वाऱ्याच्या कानीं
अन् गुपिताचें गाई गाणें ...
... गंधमोहिनी
स्वरास लाउन पराग–उटणें !
गंध दरवळे ...
... सूरहि घुमले
दाहि दिशांच्या कणाकणांतुन
आणि कुणाचें ... !
कुणास ठावें ... ?
... काय हरवलें !
हंसते आहे गंधमोहिनी

हले जागती निमिष पापणी ...
... इतक्यामधुनी
आणि जागती पापणि चोळी
अपुले डोळे
नवीन कांहीं
नकळत आहे
तिजला घडलें
एक कमळ हें फुललें आहे
गंधमोहिनी !
गंधमोहिनी ! !
गंधमोहिनी ! ! !

□
□
□

## ही कविता

□
□
□

ही कविता ही सरिता
वेगवती ही युवती
मधुमती ही मधु वांटित
धांवतसे दो हातीं

ही कविता तेजलता
मातींतच रुजणारी
शून्याचा वेध घेत
आकाशीं फुलणारी

ही कविता ही मृदुता
पुनवेच्या स्पर्शांतिल
प्रीतीच्या कमळाच्या
हृदयाच्या कोषांतील

ही कविता ही दयिता
पतिव्रता राजेश्वरि
शिवशिरिची गंगा ही
समृद्धा अधिकारी

ही कविता ब्रह्मसुता
शून्याची ही पुतळी
स्मितललिता लोभस ही
गालींची गोड खळी

ही कविता ही तडिता
मेघांच्या हृदयांतिल
बंधमुक्त स्वैर तान
ही विराट गीतांतील

ही कविता भावकथा
मृदु मधुता स्वप्नींची
चांदण्यांत न्हात गात
पडछाया भक्तीची

ही कविता दिन सरतां
फुलणारी तेजकळी
ही कविता तम विरतां
हंसणारी कुसुमकळी

□
□
□

# मोहनवेल

□
□
□

तूं पुनवेपरि मादक मोहक
गर्भरेशमी गीतामधली
सळसळणारी लकेर नाजुक

तूं ग्रीष्मातिल उन्मद धारा
घनअंधारीं तसाच तळपत
हंसणारा शुक्राचा तारा

तूं बिजली आषाढघनांतिल
मार्दव सांगत वर उठणारी
लवलव कोंबाची मातींतिल

तूंच उषेचें स्वप्न सांवळें
सरस्वतीच्या वीणेमधलें
फूल स्वरांचें मादक पहिलें

तूं शरदांतिल पहांट हळवी
अन् जळणाऱ्या वातावरणीं
उन्मेषाची चैत्रपालवी

तूं प्रतिभेचें उन्मद यौवन
कालगतींतिल रसरसलेले
जीवनदर्शी काव्याचे क्षण

परमार्थाचें तूं आभाळ
अपार्थिवाच्या तूं मुरलींतिल
दिव्य स्वरांची मोहनवेल

# वेड

असें कसें असें कसें
लाविलेंस मज पिसें
दूर राहून पाहसी
माझ्या जीवनाचें हंसें

असें कसें असें कसें
वेड तुझें आवरेना
आवरतां ऊर फाटे
दुःख असें सांगवेना

अशी कशी अशी कशी
तुझ्या ओढीचीही व्यथा
जिथें नाहींस तूं तेथें
पेटे नित्य माझी चिता

चिता पेटलेली जरी
जाऊं कशी सांग सती
तुझी नाहीं ज्यांत ज्योत
त्यांत नसे मला गती

असें लावुनीया वेड
दूर राहसी कां सांग
कसें सांवरू मी मला
पाजलीस चढी भांग

# वेळ

तुझी माझी प्रीत
पुनवेची रात
करी बरसात अमृताची

तुझी माझी प्रीत
कस्तुरीचा गंध
उघडा प्रबंध गुपिताचा

तुझी माझी प्रीत
द्रौपदीची थाळी
तेजाची पुतळी अंधारांत

तुझी माझी प्रीत
प्रकाशाचें गाणें
अनंत उखाणे जगासाठीं

तुझी माझी प्रीत
हिरवा श्रावण
सोनेरी आश्विन समृद्धीचा

तुझी माझी प्रीत
अशी नित्य नवी
वसंतपालवी वैशाखाची

तुझी माझी प्रीत
उंबराचें फूल
फुललीसे वेळ नाहीं ठावी

# आस

कुबेराचें राज्य बुडविलें डोहीं
मन तुझ्या ठायीं
अर्पियेलें

होउनिया असा शून्याचा मालक
घाली तुला हांक
जीव माझा

तुझ्यासाठीं सारा लौकिक व्यापार
तुझ्याबीण भार
सर्वस्वाचा

पांखरूं मी माझे पंख तूं आकाश
तुझें नाम श्वास
झालें माझें

वैशाखींचें ऊन तापलेली माती
तुझिया संगतीं
चांदणें तें

शिंपूनिया रक्त फुलविली बाग
झालास सुहाग
तूंच परी

□
□
□

गुंफिल्या माळांचा करूनिया फास
लावीन गळ्यास
तुझ्या नामें

तुझ्यासाठीं आतां जगणें मरणें
तुझ्यांत विरणें
आस माझी

# ऐन वेळीं

फुले तुझ्या आठवानें
अंगीं रोमांचांचें लेणें
उमलतीं पुन्हा सारीं
मौनांतली संभाषणें

मूर्त होतीं पळ पळ
नदीकांठ हिरवळ
एकसाथ पडलेलें
मनीं वाजतें पाऊल

भेटविती जललाटा
दोन तीरींच्या दो कांठा
आणि उसासत मनीं
संगें मळिल्या ज्या वाटा

भारावला क्षण क्षण
घाली मौनाची वेसण
देवळांत वाजणाऱ्या
कानीं सनईची धून

आधीं ठरवून सारें
कांहीं बोललोंच नाहीं
तरी घुमून निघालें
आसमंत दिशा दाही

ऐन वेळीं विसरतो
असा गीताचा अंतरा
आणि एकांतीं फुलतो
असा शब्दांचा फुलोरा

□
□
□

# अमृतस्पर्श

कधीं चांदण्या बनती ठिणग्या
अवसेची अन् रात्र पेटते
काळोखाची अजस्त्र नागिण
आणि नभाला डंखुन जाते

त्या जहराच्या जहरी दंशें
पडे नभाची काया काळी
क्षितिजावरचा शुक्र विव्हळे
रडुन दंवाचे अश्रु ढाळी

त्या अश्रूंच्या अमृतस्पर्शें
पुन्हा अमृता लाभे जीवन
लालस गहिरे रंग उधळते
पुन्हां क्षितीजीं उषा चिरंतन

□
□
□

# अमर आज मी झालों

अमर आज मी झालों मरणाऱ्या या जगतीं
मीरेच्या पेल्यांतील प्राशियली मी प्रीती

सीतेच्या दिव्यांतुन उजळत मी पाजळलों
द्रौपदीच्या अन् व्यथेंत गोठुन मी विरघळलों

राधेच्या प्रीतीनें ढळतांना सांवरलों
गिरिजेच्या अन् तपांत विरघळुनी मी भुललों

बाणाच्या बाप्पांची क्षणिं केली मी शिकार
अनिरुद्धाच्या करिं मी खड्गाची बनुन धार

बलिदानीं सांपडलें मजला तें नवजीवन
शुक्राच्या पेल्यांतच मी झालों संजीवन

तोडियली मृत्यूची आज मीच ही कारा
अमर बनुन चमके नभिं शुक्राचा मी तारा

अमर आज मी झालों मरुन पुन्हा या जगतीं
मीरेच्या पेल्यांतील प्राशियली मी प्रीती

# बंगला

छोटासा मी बांधिन बंगला
नदीकिनारीं गांवशिवेवर
बाग भोवती कमानद्वारा–
वरती फुललेला गुल्मोहर

मागिल दारीं तुळसमंजिरी
प्राजक्ताची तशीच पखरण
रातराणिच्या मधुर सुवासें
रात्रीं दरवळणारें अंगण

पुढती असतिल सुवर्णचंपक
जयविजयापरि प्रवेशद्वारीं
निशिगंधाची पंगत कोठें
गुलाब कोठें कुठें मोगरी

फिकट पोपटी असेल रंग
आंतिल बाजुस शीतल स्वप्निल
खिडक्यांवरती तसेच पडदे
तलम जाळिचे निळसर श्यामल

भिंतींवरती निसर्गचित्रें
मोजकींच पण अतीव सुंदर
ज्ञानेशाची प्रसन्न प्रतिमा
दिवाणखान्यांतिल मेजावर

वस्तूवस्तू असेल तेथिल
मम पत्नीचें कलाप्रदर्शन
कौतुकांतुनी घुमतिल माझ्या
कलावतीचे कानीं कंकण

माझी म्हणुनी असेल खोली
नदीप्रवाहाकडील बाजुस
नदीकाठचा मंथर वारा
पुरविल तेथें सुमनसुवास

पुस्तकसंग्रह असेल माझा
छोटासा पण अभिनव सुंदर
फुलदाणी अन् तीन माकडें
सदैव असतिल अन् मेजावर

उभी कोपऱ्यामधें सतार
हितगुज करण्या सदैव आतुर
एकांतीं कधीं छेडिन तिजला
कधि पत्नीच्या इच्छेखातर

कधि काळीं जर बांधलाच तर
असेल माझा असा बंगला
खिडकीमधुनी मजला उठवित
किरण रवीचा येईल पहिला

नांव तयाचें काय असावें
अजून मजला सुचलें नाहीं
नांवाच्या चौकटींत फोटो
अजुन तयाचा बसला नाहीं

# गाईन प्रीत तूझी

माझी अबोल प्रीती जपते तुला उरांत
चंद्राविनाच फुलते हृदयांत चांदरात

तूं चंद्रमा नभींचा मी क्षुद्र सिंधुलाट
आलिंगण्या तुला मी वेडांत पसरि हात
ये विफलताच पदरीं मी पाहतें मनांत
शतयोजनें दुरीचा तूं हंससि अंतरांत

नाचे मयूर मनिचा पसरूनिया पिसारा
तुज पाहतांच फुलतो ओठावरी फुलोरा
परि लाज लोटते तें हितगुज आंत आंत
परधार्जिणाच माझा रे शब्द-पारिजात

वरिलें तुला मनानें सांगूं कसें तुला मी
स्वर दिव्य थोर तूझा मम अर्थहीन गाणीं
राहून दूर तुजला पूजीन अंतरांत
गाईन प्रीत तूझी होईन अन् कृतार्थ

## याचना

संपलें सांगणें शब्द झाले मुके
राहिलें हें अतां हास्य अन् पोरकें

पसरलें हें धुकें पुशित आलेखनें
ठेवुनी मागुती पोरकीं स्पंदनें

चाललों मी पुढें लोपलेल्या दिशा
अंधतेला नुरे रात आणी उषा

स्वामि होतों जिथें चाललो पाहुणा
पाहण्याला पुन्हा रूप तें त्या खुणा

जागते ही अशी संपलेली गती
पोळते अंतरा जी विझाली स्मृती

आज दारीं तुझ्या मी करी याचना
पुरव तोडूं नको एवढी कामना

संपलें सांगणें शब्द झाले मुके
दे तुझ्या एकदां बालकाचे मुके

# दुःख असें दे

दुःख असें दे दिव्य भव्य तूं
जळत उजळण्या नवीन आशा
अशाश्वताची उमटायाला
शाश्वततेच्या हृदयीं रेषा

दुःख असें दे ज्ञानेशाचे
दुरित तिमिरिंचा दीप बनाया
दुःख असें दे मज भरताचें
वैभव सारें पदिं तुडवाया

दुःख असें दे हळवें कोमल
राधेच्या जें हृदयीं भरलें
द्रौपदिच्या थाळींत आणखी
पान होउनी मागें उरलें

दुःख असें दे मज कर्णाचें
एकनिष्ठ अन् दानशूर जें
दुःख असें दे मज तुकयाचें
जगास वाटे माझें माझें

दुःख असें दे मज मीरेचें
एका पेल्यामध्यें संपलें
दुःख असें दे मज संतांचें
अनंत व्यापुन मागें उरलें

दुःख मला दे सैरंध्रीचें
विराट गूढांतुनी बोललें
दुःख मला दे बलभीमाचें
नृत्यागारीं मरून पडलें

दुःख असें दे मज ख्रिस्ताचें
जें क्रूसावर हंसतच चढलें
दुःख असें दे मज बुद्धाचें
मानवतेस्तव जें पाझरलें

दुःख मला दे शिवरायाचें
राष्ट्रधर्म तो ज्यांतुन फुलला
दुःख मला दे चराचराचें
कविहृदयाला जगवायाला

□
□
□

# नवीन

नवीन म्हणुनी तुला सांगतां
म्हणशी तूं हें जुनेंच सारें
नवीन म्हणुनी चितारले जे
ठरविलेस तूं कागद कोरे

आकाशाच्या रजतपटावर
नक्षत्रांचा जुना प्रबंध
नवीन कां मग या दिनराती
उदयास्ताचे जुनेंच बंध ?

जुन्याच वृक्षावरी उमलतें
फूल, जुन्यापरि सुगंधरंग
कालनदीचे जुनेच जळ, पण
उठणारे हे नवे तरंग

जुन्यास जगवित नवें उमलतें
असा घेउनी नवीन साज
क्षितिजावरती रोजच येतें
नवीन रूपीं अशीच सांज

एकाची सर नसे दुजाला
चंद्रसूर्यही नित्य नवीन
नवें जुनें म्हण हवें तुला तें
येणारा क्षण मला नवीन

# नोकरी

दिलेंस तूं आम्हां शब्दांचेंच धन
जठराग्नीकरितां उपास इंधन

तुझिया नामाचा करितों गजर
साथीस दिलास फाटका संसार

स्फटिकाचे सौध रचिल्याचें मोल
दीड खण खोली शेजेला चिखल

रुतलेले असे पाय चिखलांत
अनंताचा ध्यास वितीच्या मेंदूंत

दिलीस तूं अशी लष्कर चाकरी
पीठ जीवनाचें भाजितों भाकरी

तुझ्या भुकेसाठीं जीवनाचा पिंड
शिजवितों माझें उपाशीच तोंड

□
□
□



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१३४९५

## शोध

तुला शोधतां मीच हरवलों असाच केव्हां कुठेंतरी
पायांना लागली भिंगरी भरे शोधणें वेड उरीं

या वेडानें अनंत फिरलों विसरुन गेलों कुठें कुठें
जाउं नये तेथेंही गेलों भास जाहला तुझा जिथें

पाहुं नये तें पाहियलें अन् पिऊं नये जें तें प्यालों
त्या चिखलांतिल पिऊन जीवन कमळापरि मी वर आलों

फूल फूल मीं सर्व हुंगिलें रंगहि सारे निरखियले
दिनरातीचें करून पाउल ग्रहतारेही धुंडियले

या वेडानें सर्व भोगिलें विसरून गेलों काय कुठें
मी माझ्यांतच रतलों जेव्हां दिसलिस तूं लपलीस कुठें

तुला शोधतां मीच हरवलों असाच केव्हां कुठें तरी
हंसशि उरीं मज भणंग बनवुन प्रीत काय ही सांग खरी

# अपराजिता

फुलविलेंस तूं फुललें मी पण
फुलाफुलांतुन अविरत केली
तुझ्याच गंधाची मी उधळण

चोरिलेंस तूं जें जें माझें
तुझ्याचकरितां बाळगिलें मीं
होतें अविरत त्याचें ओझें

भुलविलेंस तूं भुललें मी पण
भोळी राधा मनांत माझ्या
चिंतन करिते तो तूं मोहन

जाळिलेंस तूं जळलें मी पण
मी-पण झालें भस्मविलेपन
दरवळलें अन् जीवन-चंदन

जिंकिलेंस मज हरलें मी पण
पराभवाचें दुःख न मजला
ज्यांतुन मिळतो अपुला साजण

□
□
□

# कोडें

कधि बनतों मी तुकाराम अन्
रचीत बसतों अभंग ओळी
कधि स्वप्नांच्या बिड्या फुंकुनी
प्रेमवीर कधि-कधि मवाली

कधि बनतों मी पार्थसारथी
जगास सांगत सुटतों गीता
कधि बनतों मी राघव हळवा
जडाजडाला पुसतों सीता

कधि बनतों सिद्धार्थ आणखी
निर्वाणाचें चिंतन करितों
कधि बनतों मी सखाराम अन्
रांडा-पोरांसाठी रडतों

बनतों विश्वामित्र कधीं मी
डोळ्यांवरती ओढुन पडदा
आणि लावितों वेड कुणाला
सतार छेडुन दिड दा दिड दा

असें कोण मी, या प्रश्नाचें
अटकेपाशीं अडतें घोडें
असें कोण मी, याचें मजला
अजून सुटलें नाहीं कोडें

# तुझ्यासाठिं साहीन

नको येथ थांबूं जरी पोळलों मी
तुला जायचें ना इथूनी पुढें
जळालों पतंगापरी मीच माझें
पुन्हां जन्मलों वाहण्याला मढें

तुझ्या मंदिराची दिसे वाट आतां
दिसूं लागली उमटलीं पाउलें
तुझ्या पावलांच्या खुणा चुंबुनी मी
तुला वाहतों आसवांचीं फुलें

तुझ्या कीर्तिची पाहण्याला पताका
पुन्हा त्राण ये लोचनांना अतां
अतां लोचनांच्या पुढें ना धुकें तें
अतां फक्त तूझी उरे दिव्यता

नको पाहुं मागें पुन्हां तूं वळूनी
जळूं दे मला यापुढें एकला
अतां पोळणें हें असें सौख्य माझें
तुझ्यासाठिं साहीन ी या कळा

# माझें शापित जीवन

माझी स्वप्नमयी निद्रा
आतां सरली सरली
आणि स्वप्नमदिरेची
धुंद पुरी उतरली

सारें प्रभावलय तें
आता तिमिरीं विरलें
आहे परप्रकाशित
दूर होतां तूं कळलें

तुझ्या वसंतसंगतीं
मन सदाफुली होतें
अचेतन काष्ठापरी
आज नेणिवेशीं नातें

नाहीं गगनभरारी
नाहीं पाताळीं पतन
आज त्रिशंकूप्रमाणें
माझें शापित जीवन

□
□
□

## आणि तुझ्या प्रकाशांत

कधीं होऊन गुलाब
　　माझा भाव फुलवावा
आणि अंतरांत कांटा
　　तुझा वांकडा रुतावा

कधीं प्राजक्ताचा गंध
　　मनीं भरावा मधुर
तुझ्या अभंग स्मृतीनें
　　माझें चौफाळावें ऊर

तुझ्या अनाम गीताचा
　　माझ्या मना लागे ध्यास
तेव्हां बनून तूं शब्द
　　कंठीं करावा निवास

कधीं होऊन काळोख
　　मज दाखव चांदणें
आणि तुझ्या प्रकाशांत
　　माझें वितळूं दे जिणें

## नवी वाट

नवी वाट रुळवाया
हवें धांवण्याचें बळ
हवीं वांकडीं वळणें
जरा ढळायाला तोल

हवी अंतरांत आग
ओठीं हंसू कांठोकाठ
हवी सौंदर्य पिण्याला
जरा नजर ही धीट

हवें उडण्याचें वेड
हवा आकाशाचा मोह
त्याचा अर्थ सांगण्याला
काळभैरवाचा डोह

हवी जीवन-सागरीं
उठायाला काळलाट
हवे कालकूट प्याया
लाल अमृताचे ओठ

मिठी मातीस मारण्या
जलधारा व्हावे हात
हवें अवसेच्या रात्रीं
ओठीं पूर्णिमेचें गीत

□
□
□

# माझ्या कोकणभूमींत

माझ्या कोकणभूमीच्या अमृताचे झरे पोटीं
आणि करितात माड आकाशाशीं गुजगोष्टी
माझ्या कोकणभूमीचा निळा समुंदर सखा
आणि सह्य वज्रदेही ताठ उभा पाठीराखा
माझ्या कोकणभूमींत काजू फणस जांभळें
काळे कोळी कुळवाडी काळीं दगडीं देवळें
माझ्या कोकणभूमीचा आम्रफळ आहे राजा
आणि डोंगरजाळींत चाखा करवंदाची मजा
माझ्या कोकणभूमींत लाल चुटुकशी माती
ठेवी अभंग उरांत जीं जीं जोडलीं तीं नाती
माझ्या कोकणभूमींत कष्टणारे देह हाडें
आणि वनांत मनांत नित्य फुललेलीं झाडें
माझ्या कोकणभूमीचा आहे कलावंत पिंड
छाती निधडी आणखी जीभ आहे निरभीड
माझ्या कोकणभूमींत आहे अगत्य-आरती
आणि घराघरांतून गीता भागवत पोथी
माझी कोकणचीभूमी आहे सौन्दर्याची खाण
तिचें पावित्र्य राखतें परसदारीं वृन्दावन
माझ्या कोकणभूमीचें शत योजनांवरून
असें आंतल्या डोळ्यांनीं नित्य घेतों मी दर्शन

# त्या तिथें अवेळीं

सखि आठवती का गांवाकडल्या गोष्टी
तें रम्य शिवालय उभें नदीच्या कांठीं
तो भोळाशंकर पार्वतिचा ग सांब
स्मृति उरांत जपणारे ते मंदिरखांब
त्या तिथेंच लपलिस कातिव खांबामागें
मौनास पालवी फुटली लटक्या रागें
जा येउं नको तूं बोलुं नको मजपाशीं
पण फितूर नयनीं अवघडल्या जलराशी
लाविला आर्जवुन हनुवटीस मीं हात
अन् आसुं लोपले गाभुळल्या गालांत
अधरांस मिळालें तिथें आंसुंचें दान
रंगलें मुखीं मग काताविण गे पान
तें पाहुन हंसला एक कवडसा दूर
अन् लाज लाजरी लाजुन झाली चूर
गुंतल्या करांतील कर झाले बेभान
पायांत परतण्या उरलें ना अवसान
बोटांत गुंतवित पदराचा तूं शेव
तूं उगा दाविला उतावळीचा भाव
वळलीस मुरडुनी उरीं उसळली लाट
तो हंसला तेव्हां सखे नदीचा घाट
त्या घाटावरती लोभ तुझा अनिवार
त्या तिथें मिसळले सुरांत अपुले सूर

□
□
□

पलिकडे वाजली वेळुबनीं ग मुरली
अन् गौर केतकी तिथें दंवानें न्हाली
पदराची पडली रातराणीला भूल
त्या तिथेंच गेला निशिगंधाचा तोल
त्या स्थळीं झेलिला छातीवर तव माथा
त्या स्थळीं जाहलें श्वास तुक्याची गाथा
तव मधाळ बोटें केसांतुनी ग फिरलीं
ती स्पर्शपालवी निळ्या जळीं थरथरली
त्या तिथेंच थिजली कणाकणांतुन लाज
त्या तिथें अवेळीं धुक्यांत न्हाली सांज

□
□
□

## प्रीत

कधीं कधीं येते वेदनेची नशा
सांजवेळीं उषा
आनंदाची

मृत्यू कधीं जगे असा जीवनांत
जीवन डुबतां
मीरेच्या पेल्यांत

गगनमंचक चांदण्याची जाळी
प्रेमरस थाळी
मिळे तेव्हां

वेदनेला येतें असें कधीं फूल
होईना मलूल
आगींतही

गंधानें त्याचिया कोंदल्या अंबरीं
घुमते बांसरी
मीरेसाठीं

आर्ताची ती गत तेव्हां कळे मला
वेदनेच्या फुला
प्रीत नाम

# चव

तुझ्या दिव्यतेची चाखिली संगत
झालों अन् तृषार्त
आयुष्यांत

शोधी करूनियां शब्दांची ओंजळ
तुझें प्रीतजळ
ठायीं ठायीं

शब्दांची ओंजळ राहिली कोरडी
केलीस अुघडी
लाज माझी

संपलीसे माझी आदळ आपट
आणि पायपीट
आतां पुढें

माझ्याच अश्रूंनीं भिजवून ओठ
आळवितों गीत
मौनांतून

अळणी आयुष्या तेवढीच चव
उरे, देवघेव
बाकी व्यर्थ



गं..३

# जा पुढती

जा पुढती तूं—!
थांब इथें मी म्हणूं कशाला
शीतल छाया येथें नाहीं
केवळ जळतो ग्रीष्म उन्हाळा

जा पुढती तूं—!
थांब इथें मी म्हणूं कशाला
ना हें मंदिर उजाड केवळ
मार्गावरली ही पथशाला

जा पुढती तूं—!
थांब इथें मी म्हणूं कशाला
इथें न संगित धुंदसुरावट
अभंग जगतो साधा भोळा

जा पुढती तूं-- !
थांब इथें मी म्हणूं कशाला
तुझ्या स्वागता पहांट आतुर
पुढें, तुडव या काळोखाला

जा पुढती तूं !
जा पुढती ! !

# मागणें

मागणें मी काय मागूं जाणशीं तूं सर्व हेतू
मी भिकारी कल्पनांचा आणि कल्पद्रूम तूं

अक्षरांचा अंध मी अन् अक्षराचें रूप तूं
पाहण्या सृष्टी तुझी दे दृष्टि मजला दिव्य तूं

मूक मी गाऊं कसा रे मौक्तिकाचें गीत तूं
त्यांतल्या एका स्वराचें दे मला सामर्थ्य तूं

पांगळा मी अन् गतीचें विश्वविजयी चक्र तूं
धांवण्या मागें तुझ्या दे दिव्य मजला पंख तूं

भावनेचा भक्त मी रे होउनी अनुरक्त तूं
अक्षरांना देइ माझ्या आशयाचा प्राण तूं

शक्ति ना माझे शरीरीं शक्तिचें भाण्डार तूं
चालण्या तूझ्याच मार्गी दे नवें मज रक्त तूं

# स्फूर्ति

भरली होती सरली सारी
वैखरि पडली उणी
परतली अर्थाची स्वामिनी

घडी दो घडी राहुन गेली
कुशल विचारुन मना
धुळित या उठवुन मंगल खुणा

सुखास गुणिलें दुःख भागिलें
फुलवुन संवेदना
उजळिला पुन्हा घरोबा जुना

हंसली रडली माझ्यासंगें
विसरुनिया मी-पणा
दिला अन् मजला मोठेपणा

आली गेली कळलें नाहीं
केव्हां ही मानिनी
परतली अर्थाची स्वामिनी

# विश्व इष्कीं रंगलें

प्राशिली मीं इष्कमदिरा कैफ चढला रोमरोमीं
झिंगलों डोळ्यांत लाली आगळी आली बदामी

हातिचा हा इष्कप्याला मस्त धुंदीनें उते
फसफसे फेसाळुनी ये चुंबनाचें हास्य तें

स्वप्न माझें जें बिलोरी भोगितों मी मूर्त तें
भंगले स्वर परत जुळले गीत अन् हुंकारतें

बोललों कैफांत जें तें काव्य सारें जाहलें
झिंगुनी पडलों जिथें तीं ईश्वराचीं पाउलें

झिंगलों इष्कांत मी कैफांत गेलों रंगुनी
मातीतुनी उसळून हंसते इष्कची कोंबांतुनी

मश्गूल मी मश्गूल सारें विश्व माझें जाहलें
इष्क द्या रे इष्क प्यारे विश्व इष्कीं रंगलें

# स्मारक

कुणी प्रीतिचीं गीतें रचिलीं
तशींच शिल्पें जगीं किती
पदापदावर उभीं स्मारकें
गणती त्यांची करूं किती

यमुनाकांठीं ताज, पुरीला
जयदेवाचा काव्यसुवास
अजंठ्यांतलीं जिवंत चित्रें
वेरुळचें लेणें कैलास

रामगिरीवर यक्ष तळमळे
अलका अजुनी असे उदास
अक्षरदेहीं अजून विव्हळ
घरांघरांतुन कालीदास

घाट मंदिरें स्तूप आणखी
ज्ञात न सारीं कितिक अनाम
कितिक शिल्पें झालीं होतिल
कितीक जन्मतिल अन् खय्याम

प्रीतीवर मम चढवावा मीं
मला कळेना कसला साज
अरूप शब्दातीत प्रीतिवर
मी मौनाचा बांधिन ताज

# उद्धार

तुझ्या प्रीतीच्या प्रकाशीं   माझें वितळलें पाप
आतां झालों मी मोकळा   सरे भार सरे शाप

गंध रूप रंग रस   लोभावलीस पाहून
पोटीं कीड एक होती   तुझ्या केली ती स्वाधीन

न्हालें गंगाजळीं मन   झालीं अष्टांगें पावन
आणि झालें कलंकाचें   तुझ्या स्पर्शानें भूषण

आज आकाशासारखा   आहे भरून मोकळा
अंधाराशीं जडे नातें   सोबतीला चंद्रकळा

सरलें आता शुभाशुभ   गातों आनंद-भैरवी
तुझ्या पूजना आणिलीं   फुलें अक्षरांचीं नवीं

असा केलास उद्धार   एका कृपाकटाक्षानें
आतां जिणें झालें सोपें   मृत्यूच्याच वरदानें

# कुजबुज

येतें कधीं कधीं असें हें भरून
कोंडतीं क्षितिजें कधीं अकारण

लागते ही अशी वांझ हुरहुर
टाकितें उसासे वाटे कोणी दूर

मुंग्यांनीं जडावे सारें अंग अंग
सैरा धांवताती सोडोनियां रांग

असे निखळती कधीं कधीं दुवे
वाटे स्वतःसह सर्व पेटवावें

हंसें एक फूल लपून पानांत
कुजबुजे कांहीं माळाच्या कानांत

नको सोडूं धीर सोशी थोडचा कळा
हांकेवर एका आली पाणकळा..
आली पाणकळा !
आली पाणकळा ! !

# मी तृणांकुराचें पातें

मी मुक्त जीवनीं बंधन स्वीकारून
लाभलें दान मज पंखांचें गतिमान

मी आकाशाचें स्वीकारिन आव्हान
चुंबीन चांदण्या इंद्रधनुष्यकमान

लागुं दे आग वा उठुं दे तुफानवारा
मी क्षणांत एका गिळून टाकिन सारा

मी जन्ममृत्युच्या चक्रीं फिरतां फिरतां
उडवीन शलाका तेजाच्या जगिं आतां

मारीन नभीं मी अनंत उंच भरारी
अन् क्षितिजें बांधिन एका ठायीं सारीं

मी आहें इवलें तृणांकुराचें पातें
परि आहे माझें गगनदिव्याशीं नातें

□
□
□

## या तहान शमवा

मज प्रसन्न शब्दश्रीची अक्षरवेल
बोलेन अतां मी तुमच्या मनिचे बोल

उलगडीन सारें तुमच्या मनिचें कोडें
उघडीन गुपित जें त्याचीं सर्व कवाडें

देईन दगडाधोंड्यांसहि आतां वाणी
अन् पर्णफुलांतुन फुलविन मंजुळ गाणीं

लाभले पंख मज घेण्या दिव्य भरारी
अन् प्रकाशण्यास्तव तेजहि घन अंधारीं

हा मधुघट घेऊन आलों मुक्त लुटा रे
बळ येइल बघण्या नवीन सर्व किनारे

हें शब्दश्रीचें लुटा रत्नभाण्डार
हें लुटता वाढे अक्षय अपरंपार

मी गंगा घेउन आलों प्रीतिरसाची
या तहान शमवा अपुल्या सुखदुःखांची

□
□
□

# तूंच तूंच माझ्या

चकोराच्या मनीं चंद्रम चांदणें
तसें माझ्या मनीं घुमे तुझें गाणें

केतकीच्या वासें नाग धुंदावला
तशी तुझी स्मृती धुंदाविते मला

चातकाच्या मनीं पावसाचा थेंब
तसें माझ्या मनीं तुझें प्रतिबिंब

वैशाख जपतो मनीं मृगधारा
तशी तुझी प्यास लागली शरीरा

अश्विनाच्या अंगीं समृद्धीचें लेणें
तशी तुझी भेट आणि संभाषणें

तुकयाच्या चित्तीं विठ्ठल अभंग
माझ्या सौभाग्याचें तूंच तेज रंग

स्वातीच्या थेंबाचें शिपल्याला चीज
माझ्या कवितेचें तूंच आदिबीज

तूंच तूंच माझ्या भाग्याची दिवाळी
विझलेली ज्योत तूंच पाजळिली

# आधार

जगण्याचें जरि त्राण न उरलें
मरण्याचीही नाहीं हिम्मत
अजून मागें खेचित आहे
जीवनांतली कवडी किंमत

हा कवडीचा चेक घेउनी
वणवण फिरतों तरी वटेना
अन्न झांकी वस्त्र उद्यांचें
चिकटून बसलें तेंहि फिटेना

या कवडीच्या आधारानें
थांबविलाही आहे काळ
धरिलें आहे या टेकूनें
कोसळणारें वर आभाळ

या आभाळीं उडते आहे
हिरवी हिरवी स्वप्नवावडी
वटली नाहीं म्हणून फुगली
आहे ब्रह्मांडाहुन कवडी

□
□
□

# अव्यक्त

मनांत माझ्या कधीं घुटमळे
शब्दांच्या जें पलिकडलें

मी मी म्हणणाऱ्या शब्दांचा
त्या पाहुन अभिमान गळे

तर्क पांगळा होतो आणि
भावनेसही येते भोवळ

अन् तेजाच्या तिरडीवरती
शब्द व्यर्थची करिती वळवळ

अशा क्षणाच्या संभोगांतुन
अशा जन्मती निरर्थ ओळी

सांपडलें वाटून कवळती
अव्यक्ताची अशी सावली

# माझें गाणें

जोंवर जळते आहे माती
जोंवर लेते हिरवें लेणें
भावबहर जोंवरी नभाला
फुलेल तोंवर माझें गाणें

झुरतें कोणी कोणासाठीं
घेती शपथा देती वचनें
मातीवरतीं या मातीचीं
तोंवर उठतिल अशींच चिन्हें

जोंवर आहे प्रीत जीवनीं
मृत्यूवरती अन् विश्वास
फुलेल तोंवर शब्दफुलोरा
गीतें बनतिल माझे श्वास

जोंवर आहे व्यथा जीवनीं
उरांत जगती कथा नवीन
जगतिल तोंवर तप्त वाळुवर
मम शब्दांचे असेच मीन

जोंवर आहे रंग नभाला
जोंवर आहे गंध जगास
अव्यक्तांतिल रस पिळण्याचा
मम शब्दांना असेल ध्यास

ज्या बीजावर पडेल पाणी
धर्म मातिचा त्यास रुजविणें
अदम्य उत्कट क्षणांक्षणांतुन
फुलेल माझें तसेंच गाणें

□
□
□

## शासन

असा काय केला होता मीं तुझा गुन्हा
म्हणून दिलेंस तूं हें शासन ?
पुनवेचें फूल कुस्करून
ठेचलास सुगंध.....आणि
पेटवून दिलेंस
सारे बंध... सारीं क्षितिजें
...मौनाचा निखारा ठेवून
माझ्या आशांचीं अभ्रकें
काळोख्या रात्रीं भारलींस तूं
त्यांच्या किंकाळ्यांनीं
फुटली विजयाची वीणा
...तडकली ताळू
अंधारानेंहि चावली जीभ
कळवळून...
अरेरे म्हणून...
तुझा हा जीवघेणा निश्चय बघून !
असा
अगदीं अचूक साधलास डाव
नव्हे, दावा
मला अमर बनविण्याचा !
... अश्वत्थाम्यासारखा
अगतिक ...... एकाकी
जखमी ....... असहाय

मौनाच्याच बाणानें
घेतलास काढून
माझ्या मस्तकांतील पुरुषार्थ
आणि केलीस सार्थ
माझ्यावरील आपली उत्कट प्रीति
मला बनवून भ्रमिष्ट !
आणि आतां
ती जखम कुरवाळीत
(नव्हे लपवीत)
हिंडतों आहें दारोदार
रात्रंदिवस
ऐकतों आहें
चिरंजीव-चिरंजीव हे शब्द
जीव नसलेले ते शब्द ऐकून
जातो माझा जीव
माझ्याच श्वासांना साक्षीला मागें ठेवून

असा काय केला होता मीं गुन्हा
म्हणून दिलेंस हें शासन ?
मोहिनीच्या रूपानें
वाढलेंस अमृत
आणि
पुरतें कंठाखालीं उतरायच्या आंत
केलास घात
कापलास कंठ

मौनाच्याच खड्गानें
आणि
दिलेंस अमरपण
विद्रूप....अभद्रसें
राहूकेतूसारखें !

असा काय केला होता गुन्हा
म्हणून केल्यास असल्या जखमा
अजरामर !
अेकदां तरी सांग
मौनाच्या शालीनें
आतां तरी झाकूं नको त्यांना
कीं
त्यांच्या रक्तांतच विरणार आहे
तुझी मौनाची शाल ?

☐
☐
☐

# माप

सांग मग ओतलास कां
जीवनरस असल्या घटांत ?
… माहीत होतें तुला जर
गेलेत तडे जागोजाग
… … आणि आतां
विझवूं पाहते आहेस
सहानुभूतीच्या फुंकरीनें
आग !
जी तूंच पेटविलीस … …
घटांत आणि घटाबाहेर
हजार विषारी जिभांखालीं
निळा झाला शेषशायी
( नव्हे, केवल विषशायी ! )
सांग सुखानें झोपेल कसा … ?
जग म्हणतें आणि त्यालाच
परमेश्वर
जो कधींच झोपत नाहीं
घनश्याम … …
सुखनिधान … …
शेषशायी नित्य जागा
… आणि असेंच पुष्कळसें !
युगानुयुगें तो बिचारा

९३४८५

शोधीत अविरत फिरतो आहे १
सुख म्हणतात ज्याला ... तें
जीवन बनतें ज्याच्यामुळें
आव्हान केवळ □
तो अनाम एक धागा ! □
विचार कर...
अशा स्थितींत येईल का झोप त्याला ? □

नित्य चरण चुरणाऱ्या
लक्ष्मीलाही कळली नाहीं
त्याची ती निळी जखम
हृदयापर्यंन्त पोहोचले नाहींत
कधींच तिचे समृद्धीचे कोमल हात
म्हणूनच झाली फक्त ती ... त्याची
पाय चुरणारी दासी !
पाय चुरून चुरल्या दिलांतील
निळी जखम भरणार कशी ?
ती जखम कळली फक्त
राधेला
गोकुळांत कदंबाखालीं !
कारण होती ती एक
केवल मानव ...
दुःखाची चव कळत होती तिला
सुखाची वाट मळतांना ...
डोळ्यांतील अश्रु गिळतांना ...

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...... ३५८२७ ...... वि: ...... ८१८५
क्रमांक ...... ९८ ...... नों: दि: ...... २९।१५।८३

हंसत होते तिचे ओठ
त्याच आकाशाच्या ओठांनीं
चुंबिली तिनें ती
अनाम निळी जखम
आणि मग झाला जगीं
मेघश्याम ...... पुरुषोत्तम ...
पूर्ण पुरुष !

□
□
□

पण लक्ष्मीच्या डोळ्यांनीं
कधींच तुला दिसणार नाहीं
ही असली निळी जखम
सहानुभूतीच्या फुंकरीनें
म्हणूनच ही पेटती आग
विझणार नाहीं !
क्षितिजाच्या ओंजळीनें
आकाशाची निळाई
कधींच मापतां येणार नाहीं !
कधींच मापतां येणार नाहीं ! !

## अम्ही कलंदर

अम्ही कलंदर युगायुगांतील
दिव्य आमुची असे गति
आकाशावर अम्ही कोरितों
मातीमधली या प्रीती

कोश रेशमी तोडुन होतों
कधीं पांखरूं नवरंगी
साखर शोधित कधीं भटकतों
होउन मातींतिल मुंगी

वादळ होउन कधीं घुमवितों
नव्या युगाचें नवीन गान
कधि पूर्वेच्या ओठांमधली
बनून येतों प्रकाशतान

अमृतसिंचन करितों कोठें
दाहक बिजली कुठें तुफान
अम्ही कलंदर असे भटकतों
तेज-तमाचें करीत पान

अम्ही कलंदर समुंदरावर
स्वैर लोळतों बनून लाट
अम्ही कलंदर असे बिलंदर
नित्य आमुची नवीन वाट

# तुझ्याविण पण

दु:खाला फोडीन सुखाचा मी पान्हा
जर देशी मना
धीर माझ्या

आघात सोशीन अवघे जिव्हारीं
पण तूं अंतरीं
वास करी

येणारच नाहीं डोळियांना पाणी
असतां लोचनीं
तुझें रूप

पोळलेल्या ओठीं अक्षरांची वेल
अमृत स्रवेल
तुझ्यासंगें

कालकूट प्याया आतुर मी पुढें
जर तुझें जोडे
प्रेमामृत

तुझ्याविण पण व्यापार पोरका
कीर्ति अन् कौतुका
अवघे कांटे

# जर

जर दुःखच होतें केवळ माझ्या दैवीं
कां केलें नाहीं मजला मग पाषाण
आघात छन्निचे झेलुन हृदयावरतीं–
मी हंसलों असतों बनुनी शिल्प महान !

जर कुऱ्हाड होती बसायची या वक्षीं
कां केलें नाहीं मजला चंदनवृक्ष
मग मीहि सुखानें झिजलों जळलों असतों–
ठेवून मागुती अवघा जीवनवास !

जर घडता ऐसा मृत्यू मंगलदायी
तर ठरल्या असत्या वेदनाच वरदान
मग मीहि व्यथेचा गिळला असता अग्नी–
अन् जीवन झालें असतें हें आव्हान !

# मी पणती

□
□
□

मी लपेन लपलें होतें
तुझिया गे पदराखालीं
शब्दांचीं ज्याला मोत्यें
अन् उब असे मखमाली

त्या उबेंत भिजतां चिंब
जरतारि तान मज स्फुरली
मी पणती निब्वळ माती
त्यांतून प्रभा पाजळली

मी भिजेन भिजलें होतें
नजरेंत तुझ्या स्नेहाळ
मी जळलें जळेन अजुनी
उजळाया कातरवेळ

पण येतां वादळवारा
मज हवा पदर आडोसा
उजळाया अविरत मजला
तव संगत आणि दिलासा

आरती तुझी अन् जळणें
मी पणती केवळ माती
त्यामधें स्थान मज असणें
हें केवळ तुझिया हातीं

# असें कांहींसें घडावें

तुझ्यामागें धांवतांना
माझें संपावें आयुष्य
पण मिळावा अखेरी
तुझा स्नेहाळ कटाक्ष

तुझ्या कटाक्षानें सारें
माझें अंग मोहरावें
आणि भावनांना माझ्या
फूल सुगंधाचें यावें

तुझ्यामागें धांवतांना
माझें रक्ताळूं दे मन
पण घुमावी अखेरी
तुझ्या मनीं माझी तान

रुद्रवीणेंतून असें
सामगान पाझरावें
माझ्या आगीचें मंदिरीं
तुझ्या नीरांजन व्हावें

तुझ्यामागें धांवतांना
असें कांहींसें घडावें
माझ्या जखमांना रूप
धुंद सुगंधाचें यावें

# मधुघट न रिता

मज ठाउक तव मधुघट न रिता
घट रिता रिती तर ही कविता

तुझ्या घटांतुन निघतां न्हाउन
मोहरलें हें सुकलें जीवन
झरूं लागली श्वासामधुनी
गंधमोहिनी ही सरिता

तुझ्या घटाची घडणहि नाजुक
अक्षय परि ती मजला ठाउक
मृदुतेच्या अंगावर बनली
अलंकार येथें तडिता

घटांत तुझिया राधा-मोहन
घटांत तुझिया शाश्वत जीवन
रस ओसंडे तुझ्या घटांतुन
गात प्रीतिची भावकथा

घटांत तुझिया फुलल्या बागा
घटांत तुझिया रिती न जागा
एकच ओंजळ रे अनुरागा
मी तृषार्त मजला देइ अतां

## रहस्य फुटलें

गंधकळी मी लपवूं कोठें
आसमंत दरवळतें
लपवूं कैसी प्रीत सांग तव
दिशादिशांतुन फुलते

सांग लपवितां येईल कधि कां
रविला अंधारांत
आषाढाचें थांबवितां कां
येइल धारानृत्य

सांग कसा तूं लपवावा मी
कस्तुरिचा हा गंध
प्राशुन मदिरा लपवूं कैशी
नयनांमधली धुंद

वसंत येतां तरू मोहरे
कोकिळ गातो गाणें
तुला पाहतां तसेंच फुलतें
माझें गीत दिवाणें

लपवूं कैसी प्रीत सांग तव
मला न कांहीं कळतें
लपवुं कोणत्या अंधारीं मी
हें तेजाचें नातें

तुझी विजेची प्रीत लपविली
होती होउन मेघ
वादळ सुटतां रहस्य फुटलें
उमले कांचन-रेघ

□
□
□

## गाझी

दे धडक अतां ही उघडी छाती माझी
ही ऐक गर्जना त्यांतिल गर्जे गाझी
शतखंडित झाली तर शतकांच्या वरती
शकलांतुन अंकुर फुटेल फुलवित प्रीती
अणुअणूंत त्यांतिल अदम्य ईर्षा आहे
अन् मरणघटांतुन जीवन भरुनी वाहे
तव धडक बैसतां फुटेल घट तो सारा
अन् दाहि दिशांतुन झरतिल जीवनधारा
दे व्यथावेदनांचे तूं भरुनी प्याले
अन् फेक उरीं या विव्हळतेचे भाले
ही छाती उघडी करी तुला आव्हान
ही ऐक गर्जना, नव्हे प्रीतिचें गान
हें हृदयहि कोमल कोमल त्यांतिल भाव
ना फुटेल आतां घाल घणाचे घाव
अस्थींतुन जागे होतिल त्याच्या दधिची
अन् काळरात्रिच्या गर्भि उसासत प्राची
कर उभी तुझी तूं प्रतिकाराची भिंत
ना खंत हि माझी प्रीत अनादि अनंत
हा गाझी गर्जे बघ ही उघडी छाती
दे धडक अंतरीं लक्ष पेटल्या ज्योती

# छेड एकदां तार

तव स्पर्शास्तव आसुसली ही माझी हृदय-सतार
तूं छेड एकदां तार

अंकावरतीं घेउन मस्तक
छेड उरींचें तूं स्वरसप्तक
पिळल्या तारांतुनी माझिया
जागव स्वरशृंगार

छेड जोगिया अथवा भैरव
ललताचें वा उलगड वैभव
येउन कर पण या कंठावर
तुझ्या नखाचा वार

अंतरांतलें माझें संगित
तव स्पर्शास्तव बसलें जागत
स्पर्शाविण तव जीवन बनलें
या शरिरीं अंगार

पिळल्या तारा पिळलें अंतर
एकच वांछी तुझा मृदुलकर
अमृतमय झंकार छेडतां
तुटुं दे जीवन-तार

# ती मी तर काळीं रात्र

पापणी बनुन तूं माझी
रक्षिलेस दृष्टी डोळे
सावली बनुन तूं माझी
प्राशिलेंस विषही काळें

कधिं पुढें कधीं तूं मागें
अव्याहत माझ्या असशी
कधिं प्रकाश गिळुनी सारा
माझ्यांत विरूनी हंसशी

त्या क्षणीं उजळतें माझें
या जगांतलें अस्तित्व
जग म्हणतें उन्मद सुंदर
ती मी तर काळी रात्र

□ □ □

# वारी

आर्जवावें मी तुला आणि तूं ना दाद घ्यावी
तरिही मी वेड्यापरी नित्य तव वारी करावी

घेउनी दिंड्यापताका गात अन् तूझींच गाणीं
पेटत्या तुडवीत वाटा तारुं लोटावें तुफानीं

उठति मार्गीं प्रलयलाटा अन् घुसे शीडांत वारें
तगमगावें एकला मी पेटतां सारे किनारे

फोडण्या टाहोहि आतां त्राण ना उरलें शरिरीं
मोजिलें मी सर्व माझें त्यांत ना केली उधारी

म्हणशि अपुला आणि कां भेट तूं मग टाळिशी
कल्पवृक्षाखालिं कां ठेविशीं मजला उपाशी

भेट वा भेटूं नको करणार मी ना आर्जवें
जळलीं अतां वारींत या माझीं हंसूं अन् आसवें

भेटिसाठीं मीं जगावें आणि तूं ना भेट द्यावी
प्रेमिकानें कां कधीं लोककलज्जा पांघरावी ?

# सुख माझें पुढें गेल्यावर

घालीत मी नाहीं कोणाला सांकडें
कशाला वांकडें
बोलूं आतां
जन्मभरी मूक सोशिल्या यातना
शेवटच्या क्षणा
मौन बरें

प्रकाशाची भीक मागतां अखेरी
प्रकाशानें झोळी
करपली

मिळालें तें ऐसें अतुल अचाट
जीवनपहांट
कोळपली

मागितले होते भूपाळीचे स्वर
भैरवी कातर
आली पुढें

आळवीन तिज होणार ना कष्टी
आनंदाचा यात्री
बनूनिया

कशाला मी घालूं कोणाला सांकडें
सुख माझें पुढें
गेल्यावर

# भीत होतों ज्याला

भीत होतों ज्याला तेंच झालें दास
कंठीं झाला फांस
पुष्पमाला

अर्ध्यावरी असें लाजलें मरण
झाले अग्निकण
दंवबिंदू

पोहोचलों जेव्हां मृत्यूचिया दारा
जीवनाचा झरा
वाहे तेथें

कशाला फिरावें तिथून मी मागें
जाहलेंसें जागें
भाग्य माझें

तयाच्या कुशींत विसावलों आतां
अनंताची गाथा
सोबतीला

कवडीला लाभे असें लाख मोल
अंकुरली वेल
अक्षरांची

भीत होतों ज्याला तेंच झालें दास
कशाला उदास
व्हावें मग

# नाटकाच्या रंगीं

संपलें नाटक संपलेंसें सोंग
लाविला जो रंग
उतरेना

रंगलेलें तोंड पाहून हासती
होतसे फजिती
जगामाजी

लाविलास रंग माझिया मुखाला
पुसण्याची कला
वगळून

संपलें नाटक परी उरे रंग
पोळतसे अंग
आतां त्यानें

रंग पुसण्याचें कसब ज्या अंगीं
नाटकाच्या रंगीं
तोच भला

□
□
□

# चुकलेल्या मार्गावर

चुकलेल्या मार्गावर भेटलीस मजला तूं
नकळत मीं उलगडले चुरगळलेले हेतू
आलिस तूं शरदांतिल माळुनिया शिरिं चंद्रम
अन् दिलेंस मजला तूं रजताचें आमंत्रण
पांघरुनी आलिस तूं मधुवंतीचें लाघव
मज म्हणशी आतां मी राधा अन् तूं माधव
मी भरला भारावुन हृदयाचा कलश रिता
क्षणभंगुर क्षण पकडुन लिहिल्या मी अन् कविता
म्हणशी तव प्रतिभा मी आणि श्रेष्ठ तूं कविवर
घाल करीं कर माझ्या चल कीर्ती शिखरावर
मीं म्हटलें पण अपुलें सांग असें कोठें घर
इथुन पुढें म्हणशी तूं कळलें ना पण अंतर
उलगडीत स्वप्नांच्या मजपुढती पायघड्या
चल पुढती म्हणशी तूं बिचकतोस कां वेड्या
चालत मी तव मागुन पाहत तव इंद्रधनू
अन् सुटली हातांतुन माझ्या माझीच तनू
तूं प्रसन्न माझ्यावर ही सरली बेहोशी
शाश्वतिच्या मार्गावर पडल्यावर तोंडघशी
'इथुन पुढें'चा कळला मग मजला अर्थ नीट
अन् धुक्यांत विरताना दिसलें घर आणि वाट

# रक्ताळली वीणा

होतें नव्हतें तें सारें तूं घेतलें
आयुष्य गंजलें
आतां माझें

स्वर देवोनिया कापलास कंठ
दिलेंस तूं व्रत
गावयाचें

छिनलेंस माझें एकाकी जीवन
दिलेंस तूं धन
दुराव्याचें

नेलीस प्रतिमा भरून गाभारा
ठेवून निखारा
गंधावरी

कोंदाटला धूर श्वास कोंडे त्यानें
उघडचा लोचनें
जीव गेला

देऊन मजला आकाशाची भूक
कापिलेस पंख
माझे कां तूं

□
□
□

लेखणीचा माझ्या नेलास ओलावा
कुडीवीण जीवा
काय अर्थ

कोरडी लेखणी देऊन हातांत
सांगशी तूं गीत
लिहावया

उठतात चरे लाभेना अक्षर
त्यांत कलेवर
जगे माझें

नको म्हणूं याला कवीच्या कल्पना
रक्ताळली वीणा
भावनेची

□
□
□

# कहाणी

घायाळ या दिलाची मी सांगतों कहाणी
स्वप्नें विरून गेलीं ही राहिली निशाणी

मी स्वैर मुक्त होतों पुष्पास चुंबणारा
मी धुंद रंगलेला गंधांत धुंद वारा
कां भंगलास माझा अलवार राग सोहनी ?

तूं छेडुनी मनाच्या गेलीस प्रीत-तारा
झंकार राहिला तो बनला असे निखारा
जाळी न भावपुष्पें ना जातही विझोनी !

विश्वासलों तुझ्यावर मीं मानिला इशारा
हातीं दिलें सुकाणूं अन् सोडिला किनारा
अर्ध्यावरीच तूं पण मज सोडिलें तुफानीं !

जें पाजिलेंस त्याचा हा कैफ ओसरेना
विसरूं शके न मी त्या गंधीत धुंद स्वप्ना
हा दोष काय माझा मी राहिलों इमानी ?

झाली अबोल माझी आनंदगीतवीणा
कां खेळलीस तूं हा गे खेळ जीवघेणा
कां फुलविलींस पुष्पें जाण्यास कुस्करोनी ?

# सोनेरी गाणें

" विसरुन जा स्वप्नासम " हें तूं कशास सांगायास हवें
विसरुन जाइन पडेल जर तर दिव्य याहुनी स्वप्न नवें

स्वप्न भव्यसें असें ज्यांतुनी कधीं न येइल मजला जाग
जरी पेटली दाहि दिशांतुन माझ्याभवतीं भीषण आग

स्वप्न असें कीं कोमल केवळ तुझीच दुसरी भावरती
" विसरुन जा " या तव शब्दांची ज्यांत जाहली शिल्पकृती

स्वप्न असें जें विराट ज्याच्या हुंकारीं हो नव निर्माण
स्वप्न असें जखमी परि स्रवतें ज्या जखमांतुन जीवनगान

स्वप्न असें गंधीत शराबी नवयुवतीपरि ज्याची धुंद
स्वप्न असें जें नवथर वेडें तारुण्यापरि जें बेबंद

स्वप्न नवें जर पडलें मजला हें असलें याहून दिवाणें
विसरुन जा मज या शब्दांचें बनवित सोनेरी मी गाणें

# पहिला कवी

माधवी फुलली सुगंधा हा उरीं वैशाख पेटे
प्रीत फुलते लेऊनिया वेदनांचे लक्ष कांटे

दीप हा उधळी प्रकाशा तेवणारी ज्योत जळते
वर्षतें जल ज्यांतुनी त्यांमधें बिजलीहि जळते

प्रीतिकमळाभोंवतीं या अशा अग्नीशिखा
प्रीत ना लाभे कुणाला त्यांजला अव्हेरितां

पीयूष तें लाभावयाला वीष प्यावें लागतें
प्रीतिच्या मार्गीं अशीं गे वेदनांचीं हीं भुतें

भाववीणेच्या उरीं गे वेदनांचा घोळका
ताणती तारा भतें अन् स्पर्श होतो बोलका

या भुतांनीं निर्मिला गे या जगीं पहिला कवी
ज्या उरीं वैशाख पेटे लाभते त्या माधवी

# कोरीव लेणीं

तो करीत दिड्दा उरांत यौवनतार
नयनांत तरळता निषाद अन् हळुवार
शोधीत षड्ज आसरा अधीर घुटमळली
तो कविता होती अमृतकलशामधली !

नयनांत तरळते भावसुमांची माला
प्रीतिनें घातलें अधीर मौन जन्माला
त्या कातर हळव्या विरघळली करपाशीं
तो कविता होती अमृतकलशामधली !

त्या क्षणीं उतरली गालीं संध्यालाली
नजरेंत मिसळुनी नजर पदीं स्थिर झाली
ते जपत क्षण उरीं होती ओलेचिंब
तो कविता होती अमृतकलशामधली !

हृदयांत फोडुनी अंकुर चैतन्याला
ओठांवर केला रिताच चुंबनपेला
त्या पेल्यावरची अन् नक्षी उजळीत
तो कविता होती अमृतकलशामधली !

हीं कोरिव लेणीं कोरुनिया सर्वत्र
ती विरून गेली धुंद चांदणी रात
अनिकेत राहिला मागें गंध दिवाणा
घुटमळे अजुन तो अमृतकलशाभंवती !

# नव्या युगीं

डांबरी सडक   प्रसिद्धी भडक
अस्तरी कडक   नव्या युगीं

मार्गी वीजबत्ती   शिक्षणाची सक्ति
विज्ञान ही शक्ति   नव्या युगीं

बाजारांत पत   शेतामधें खत
महत्त्वाचें मत   नव्या युगीं

मंतरी दगड   जोड ही अजोड
घुमे हें पवाड   नव्या युगीं

दारूबंदी सक्त   हातभट्टी फक्त
चालतसे मुक्त   नव्या युगीं

रोज नवा पक्ष   स्वार्थावर लक्ष
असा नित्य दक्ष   नव्या युगीं

सेवा ही फॅशन   दौरे तीर्थाटन
कार्याचीच वाण   नव्या युगीं

सभेमधें टाळी   करावी टवाळी
धर्म अफूगोळी   नव्या युगीं

नायलॉन साडी   दावी अंगकाडी
नेसून उघडी   नव्या युगीं

सिनेमाचीं गाणीं आळविते वाणी
हपिशी तरुणी नव्या युगीं

जागेला पागडी धनलाभा कोडीं
कागदाचीं घोडीं नव्या युगीं

नवें अतां नाणें ऐकिवांत सोनें
नकली दागिने नव्या युगीं

बांधण्याला माडी करावी लबाडी
फिरवा पगडी नव्या युगीं

नित्य घोळा गोंडा वरिष्ठांपुढती
होण्याला बढती नव्या युगीं

तीर्थीं गर्दी फार भक्तीचा व्यापार
भरा तेथें कर नव्या युगीं

करा जाहिरात छापा नटी-नट
खप हो अफाट नव्या युगीं

आतां श्रमदान नवें तीर्थस्थान
समतेचें गान नव्या युगीं

असाध्य तें साध्य लावितां वशिला
करा खिसा ढिला नव्या युगीं

कॉस्मॉपॉलिटन नव्या युगीं वाटा
काँक्रिटाशेजारीं उडतो फुफाटा

□
□
□

# धन

तूं स्वप्नांचें माप
उंबरठ्यावर लवंडून आलीस
आणि
पेंगुळल्या हिरवळीवर
दंवबिंदूचें हास्य उमललें
पारावरचा पुरातन पिंपळ
झाला जागा
त्या अमृत-हास्याचा कैफ
त्याच्या गाण्यांत झाला चंदेरी

उसासल्या धरणीच्या मिठींत
आकाश विरघळलें
धुक्याच्या पडद्याआड
मनाचा माड उंच झाला
टांचा उंचावून
हातीं श्रीफळ घेऊन
नवागतम् सुस्वागतम् करीत
प्रत्येक क्षण .....
प्रत्येक कण .....
गंधित करीत
एक अनाम धूपवेल
स्पर्शून गेली

क्षितिज अन् क्षितिज .....
आणि
रानावनांत .....
पानापानांत .....
मनामनांत .....
घुमले स्वर
या रे या रे लहानथोर
यातीभलते नारीनर
धन्याचें भांडार फुटलें आहे
तुम्हांला जाईल तें घेऊन जा
रितेपणाचा रांजण
स्वप्नांनीं भरला आहे
कांठोकांठ !

दा. क्र. 93०९५

# मिठींत घेई क्षण येता

जें घडलें तें पडलें मागें
वर्तमान कां बुडविशि त्यांत
भविष्य उज्ज्वल पुढें तयाच्या
स्वागतास उंचावी हात

गा गाणें तूं खुशाल, छेडी
मुक्त आपुली हृदय-सतार
लववित स्वर तूं पुढें पुढें चल
पुढेंच आहे जयजयकार

पुढें पुढें चल नित्य देत तूं
देतां वाढे असलें दान
उलटित चल तूं वाचुन झालें
तें नियतीचें पानन् पान

अखंड देणें धर्म तुझा जे
घेतिल त्यांचा होइ ऋणी
वर्तमान गतिमान न होई
करीत बसतां मनधरणी

जें घडलें तें पडलें मागें
मिठींत घेई क्षण येता
सृजनशील रत नव्या क्षणाशीं
ज्याच्या गर्भी तेजलता

□ □ □

REFBK-0013495